# सीमोल्लंघन

दसरा म्हणजेच सीमोल्लंघन - या दिवशी आपण शस्त्रपूजा करतो. एकमेकांना सोने देतो आणि दिवस आनंदात घालवतो. या सणालाही काही ऐतिहासिक पौराणिक पार्श्वभूमी आहे. रामाने या दिवशी रावणाचा वध केला, पांडवांनी आपली शस्त्रे शमीच्या वृक्षावरून याच दिवशी काढली. शिवाजी महाराज, पेशवे, इतर सर्व सरदार याच दिवशी शस्त्रपूजा करून मोहिमांसाठी बाहेर पडत. हे सर्वच आपल्याला माहित आहे, पाठ आहे.

पण मी जरा वेगळा विचार मांडणार आहे. सीमा म्हणजे मर्यादा आणि उल्लंघन म्हणजे ओलांडणे. मग मर्यादा ओलांडणे म्हणजे सीमोल्लंघन. या मर्यादा ओलांडल्यामुळे कोणाचे खूप तोटे झाले आहेत तर कोणाचे खूप फायदे. आपल्याला माहित आहे, सीतेने, लक्ष्मणाने घालून दिलेली मर्यादा ओलांडली आणि तिने आयुष्यभराचे दुःख ओढवून घेतले. हनुमानाने सागराची सीमा ओलांडली आणि त्याला सीताशोधाची इप्सित गोष्ट साध्य झाली. द्रौपदीने वधूची मर्यादा ओलांडली, भर स्वयंवरात कर्णाचा अपमान केला आणि आयुष्यभराचे वैर, द्वेष ओढवून घेतले, तीच चूक तिने पुन्हा दुर्योधनाचा अपमान करून केली आणि कौरव पांडवांतील वैराच्या [illegible] आहुतीच मिळाली. पांडवांनी न्याय्य हक्क मिळविण्यासाठी सामोपचाराची सीमा ओलांडली आणि हस्तिनापुरच्या साम्राज्यावर आपला हक्क मिळवला.

सम्राट अशोकाने भारताच्या सीमा ओलांडून बाहेरील देशात बौद्ध धर्माचा प्रसार केला. शिवाजी महाराजांनी मुघलांच्या अन्याय, जुलूम, गुलामगिरी यांच्या सीमा ओलांडून स्वराज्य स्थापनेचे महान कार्य केले. पेशव्यांनी दिल्ली तख्तावर सुद्धा अधिराज्य गाजवले.

www.navneet.com
Page No.:
Date: / /

लांब कशाला आनंदीबाईंनी भारताच्या सीमा ओलांडल्या आणि डॉक्टर सारखी अवघड पदवी प्राप्त केली. रखमाबाईंनी १००-१२५ वर्षांपूर्वीच्या काळात लहानपणी झालेले लग्न मला मान्य नाही हे ठामपणे सांगितले आणि घटस्फोट मिळवला. पुढे त्याही डॉक्टर झाल्या. अनेक समाज सुधारकांनी समाजात पूर्वापार चालत आलेल्या दुष्ट रूढी, परंपरा, रीतीरिवाज यांच्या सीमा आपल्या कर्तृत्वाने ओलांडल्या आणि त्याच मुळे समाजात क्रांती होत गेली. प्रगती होत गेली.

कोणतेही खेळ, स्पर्धा, परीक्षा या सर्वांसाठी विशिष्ट ध्येय ठरवावे लागते. त्यासाठी अथक परिश्रम करावे लागतात. अनंत अडथळ्यांच्या सीमा पार कराव्या लागतात. त्याच वेळी यशाचे शिखर नजरेत येते. आणि उत्तुंग यश पदरी पडते.

आपणही कोते विचार, द्वेष, राग, असूया यांच्या सीमा ओलांडूया आणि आपले मन स्वच्छ, सुदृढ, निरोगी बनवूया.

सौ. मृदुला बापट.
कोल्हापूर.



